# आर्थिक स्वातंत्र्याची खुण : मजुरी करणाऱ्या महिलांचे जीवन

**कु. प्राजक्ता बी. घोटेकर**
(सहाय्यक प्राध्यापक)
आदर्श पदवी महाविद्यालय, गोंडवाना विद्यापीठ
गडचिरोली, .महाराष्ट्र
Email - Prajughotekar04@gmail.com
मो. नं. 7218478346

---

**सारांश :**

*मानवसमुहात स्त्रीजातीचा जवळपास निम्मा हिस्सा आहे. स्त्रियांना प्रोत्साहित करणारे वर्तन करुन त्यांचा जीवनस्तर उंचावण्याकडे दुर्लक्ष करण्यापासून ते त्यांचा छळ आणि अत्याचार करण्यापर्यंत अनेक प्रकारे हितत्वाची वागणूक स्त्री जातीला मिळत राहीली आहे. महिलांना फक्त 'चुल आणि मुलं' याकडे लक्ष दिले पाहिजे, असे अनेक जणांना वाटते. परंतु आता महिलांना 'चुल आणि मुलांसोबतच' 'देश आणि विदेश' यांच्याकडे सुद्धा लक्ष देण्याची गरज आहे. वैद्यकिय सुविधा मालमत्तेची मालकी, पतपुरवठा, प्रशिक्षण आणि रोजगारात पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना कमी संधी मिळते. त्याचबरोबर स्त्रीयांना प्रत्येक कामात कमी संधी असतांना स्त्रिया बाहेर मजुरीला का जातात? तसेच त्यांच्या या मदती दरम्यान त्यांच्या कौटुंबिक, आर्थिक व सामाजिक परिस्थितीमध्ये कोणते परिवर्तन होत आहेत? तसेच मजुरी बद्दल त्यांचे कौटुंबिक मत काय आहेत? इत्यादी प्रश्ने सामोरे असतांनाही स्त्रीयांना शिक्षणाच्या अभावामुळे कुटुंबाला अनेक आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागते. तसेच गरजा पूर्ण होतील एवढे वेतन मजुरांना कामाच्या मोबदल्यात मिळत नसल्यामुळे राहणीमानाचा दर्जा, त्यांच्या शैक्षणिक गरजा ते योग्यप्रकारे पुर्ण करू शकत नाही. पैशाच्या अभावामुळे हालाकीचे जीवन जगावे लागत असते. प्रस्तुत संशोधन लेखात गडचिरोली तालुक्यातील वाकडी गावातील मजुरी करणाऱ्या स्त्रीयांच्या जीवनामध्ये झालेल्या बदलांची मांडणी करणार आहे.*

**मुख्य शब्द :-** आर्थिक, स्वातंत्र्य, मजुरी, महिला, जीवन

---

**प्रस्तावना :**

भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी ५०% स्त्रीया आहे. महाराष्ट्रातील ५०८.४ लक्ष लोकसंख्येपैकी १८७.३ लक्ष श्रमिक वर्ग आहे. ही श्रमिक इतर कामासाठी मजुरी करतांना दिसून येतात. कारण कामगाराला त्याच्या श्रमाबद्दल पैशाच्या स्वरूपात जो मोबदला मिळतो. त्याच्या माध्यमातून त्यांचा उदरनिर्वाह होत असतो, त्याचबरोबर मजुरी म्हणजे, कामगाराला त्याच्या श्रमाबद्दल पैशाच्या स्वरूपात जो मोबदला मिळतो, त्याला 'रोख मजुरी' असे म्हणतात. रोख मजुरी प्रत्येक कामगाराला दररोजच्या श्रमाबद्दलचे वेतन म्हणून दिले जाते. श्रमिकाला त्याच्या श्रमाबद्दल जरी रोख मजुरी दिली जात असली, तरी श्रमिकाचा मुख्य हेतु रोख मजुरी खर्च करून आपल्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी असल्या कारणाने त्याचे लक्ष रोख मजुरीच्या वास्तविक मुल्यांकडे असते. म्हणून रोख मजुरी आणि वास्तविक मजुरी यांमध्ये फरक केला जातो.

**स्त्रि – मजुरी :**

अनेक उद्योगधंद्यात स्त्रीमजुरांच्या मजुरीचे दर पुरूष मजुरांच्या दरींमध्ये कमी असतात. या परिस्थितीला



Research Hub International Journal

अनेक कारणे आहेत; काही धंद्यात स्त्रीमजुरांना मज्जाव असतो, म्हणून इतर उद्योग धंद्यात त्यांची गर्दी होते. त्यामुळे काही विशिष्ट धंद्यात स्त्रीमजुरांचा पुरवठा फारच वाढतो आणि म्हणून त्यांच्या मजुरीचा दर घसरतो. काही उद्योगधंद्यात स्त्रिया आणि पुरूष मजुर एकत्र काम करू शकतात. तेथेही स्त्रीयांना काही मजुरी दिली जाते, कारण स्त्रिया पुरूषांपेक्षा कमी कार्यक्षम असतात. बोजड कामे त्यांना झेपत नाहीत, केवळ असहाय्यतेमुळे त्या कामावर आलेल्या असतात. त्या कधी नोकरी सोडून जातील याचा नेम नसतो. काही उद्योगधंद्यात स्त्रिया पुरूषां इतक्याच कार्यक्षम असतात आणि सारखेच काम करतात. तरी सुद्धा स्त्रियांना केवळ स्त्रिया म्हणून कमी मजुरीवर काम करावे लागते. स्त्रियांची असहाय्य परिस्थिती त्यांचे समाजातील स्थान, स्त्रियांच्या बाबतीतील पूर्वग्रह यांमागील कारणे होत. बौद्धिक कामच्या बाबतीत मात्र स्त्रीपुरूषांना समान वेतन दिले जाते.

**स्त्रीयांची भूमिका :**

प्राचीन काळापासून तथाकथित उद्योगक्षेत्र हे स्त्रिच्या दृष्टिने एक उपेक्षित क्षेत्र मानले गेलेले आहे. परंतु विद्यमान आधुनिक व खुल्या अर्थव्यवस्थेच्या युगात औद्योगिक क्षेत्रात अनेक स्त्रिया उद्योजक व कामगार म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. एखाद्या उद्योगाची स्थापना करून त्याचे संचलन वा त्या उद्योगाला यशस्वी करण्यासाठी विविध कार्यांची जबाबदारी पार पारडणारी स्त्री म्हणजे स्त्री – उद्योजक. सध्या सर्वच क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने त्या काम करीत असून औद्योगिक क्षेत्रातही त्या मागे नाहीत. प्रगत राष्ट्रांच्या संदर्भातील पाहणीच्या आधारे असे निष्पन्न झाले की, धुलाई व्यवसाय (लाँड्री), सौदर्यसाधना केंद्र (ब्युटी पार्लर), बेकरी, गृहोद्योग, हॉटेल, शिक्षण व माहिती – तंत्रज्ञान तसेच बाहेर मजुरी करण्याकरिता देखील जात असल्याचे आढळतात. तसेच पुरूषांच्या खांद्याला – खांदा लावून प्रत्येक उद्योग क्षेत्रांत आपला सहभाग नोंदवित आहेत. सामान्यपणे स्त्री उद्योजक विशिष्ट प्रकारच्या व मर्यादित उत्पादन करणाऱ्या लघुउद्योग क्षेत्रात व्यस्त आहेत.

विकसित व विकसनशील देशांत व समाजात स्त्रीया स्वत: पुढाकार घेऊन उद्योजकाची भूमिका पार पाडीत आहेत. त्यामुळे त्यांच्या कुटुंबामध्ये उद्भवणाऱ्या ज्या आर्थिक समस्या आहेत त कमी करण्यास व योग्यरितीने घर चालविण्यास मदत होत आहे. पुरूषांप्रमाणेच स्त्रिया देखील सकाळला घरची सर्वे कामे आटोपून बाहेर घरच्या उदनिर्वाहासाठी कामारिता/मजुरीकरिता जात असतात. परंतु काही महिला ह्या मनोरंजनासाठी देखील कामाला जात असल्याचे आढळून येतात.

पूर्वीच्या व सध्याच्या काळाचा विचार करता समाजात स्त्रि-पुरूष समानता आल्याने कुटुंबातील ज्या काही समस्या येतात. उदा. मुलांचे शिक्षण, कौटुंबिक गरजा, आर्थिक समस्या या सर्व बाबींची कमतरता दुर करण्यासाठी पुरूषांना समानतेने मदत करण्यासाठी तसेच घर चालविण्यासाठी पुढे आलेल्या आहेत. तसेच त्या स्वत: सक्षम होऊन कौटुंबिक गरजा भागविण्याकरिता पुरूषांच्या बरोबरीने कार्य करीत असल्याचे आढळून येतात. अशाप्रकारे स्त्रिया घर चालविण्याबरोबरच कौटुंबिक गरजा दुर करण्यासाठी मजुरी, कामगारच्या माध्यमातून कार्य पार पाडीत असतात.

**संशोधन साहित्य पडताळा :**

1. "कामगार कल्याण" या पुस्तकात शरदचंद्र गोखले यांनी असे निष्कर्ष मांडले आहे की, या पुस्तकात कामगार मजुरीच्या समस्या व त्यांना त्यांच्या भेळसावणाऱ्या समस्या या विषयी आपले मत व्यक्त केले आहे. स्वतंत्र मजुर पक्ष १९३६ साली स्थापन झाली. स्वतंत्र मजुर पक्षाने १९३७ ते १९३९ या दरम्यान महत्वाची कामगिरी केली. मजुरीला जात असतांना स्त्रिया अशी कष्टाची कामे करू लागली. मजुरीला

जातांना मजुरांना कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक समस्यांचा सामना करावा लागतो. आणि त्यांना योग्य मजुरी देणे, योग्य हमीभाव देणे गरजेचे आहे. तरच त्यांच्या आर्थिक प्रगतीला गती मिळणार.

2. निर्बाधावादी अर्थशास्त्रज्ञांच्या मालिकेतील एक प्रसिद्ध फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ टरगॉट यांनी प्रथम कामगाराला मिळणारी मजुरी ही त्याला स्वत:चा व कुटुंबाचा खर्च चालविण्यासाठी कराव्या लागणाऱ्या खर्चाएवढी असते, हा विचार मांडला. दीर्घकाळात कामगारांना मिळणारी मजुरी ही फक्त त्यांचा व त्यांच्या जीवननिर्वाह चालविता येईल एवढीच असते. कामगारांच्या व त्यांच्या कुटुंबाच्या काही आवश्यक गरजा असतात. ह्या गरजा भागविण्याकरीता त्याला जो कमीतकमी खर्च करावा लागतो तेवढीच मजुरी त्याला दीर्घकाळात प्राप्त होते. डोव्हिड रिकार्डो यांच्या शब्दात, "कामगारांना मिळणारी मजुरी त्यांना स्वत:चे अस्तित्व टिकवून आपला वंश चालविणे शक्य होईल एवढी असते."

**अध्ययन पद्धती :**

**उद्देश :**

1. मजुरी करणाऱ्या महिलांच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे.
2. मजुरी करणाऱ्या महिलांच्या सामाजिक जीवनामध्ये झालेल्या परिवर्तनाची तपासणी करणे.

**उपकल्पना :**

1. मजुरी करणाऱ्या महिलांच्या आर्थिक स्थितीत सकारात्मक बदल झालेला दिसून येतो.
2. मजुरी करणाऱ्या महिलांच्या सामाजिक दर्जात वाढ झालेली दिसते.

**तथ्य संकलनाची साधने :**

1. प्राथमिक साधन : मुलाखत अनुसूची
2. दुय्यम साधन : विविध संशोधन लेख, मॅग्झीन लेख, वेबसाईट्स इत्यादी.

**अध्ययन क्षेत्र :**

गडचिरोली तालुक्यातील वाकडी गावातील मजुरी करणाऱ्या महिलांच्या सर्वेक्षणाचा अहवाल.

**सारणी क्र. १**

**मजुरीमुळे घडून आलेले परिवर्तन दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | आर्थिक परिस्थिती सुधारली | १० | ३३.३३ |
| २. | मुलांच्या शिक्षणात वाढ | ०८ | २६.६६ |
| ३. | दैनंदिन गरजा भागल्या | ०९ | ३०.०० |
| ४. | बदल झालेला नाही | ०३ | १०.०० |
| | **एकूण** | **३०** | **१००.००** |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, एकुण ३० उत्तरदात्यांपैकी १० उत्तरदात्यांची मजुरीमुळे आर्थिक परिस्थिती सुधारली असून त्याचे शेकडाप्रमाण ३३.३३ टक्के आहे. तसेच ०८ उत्तरदात्यांची मजुरीमुळे मुलांच्या शिक्षणात वाढ झाली असून त्याचे शेकडाप्रमाण २६.६६ टक्के आहे. तर ०९ उत्तरदात्यांची मजुरीमुळे दैनंदिन गरजा भागल्या असून त्याचे शेकडाप्रमाण ३०.०० टक्के आहे. व ०३ उत्तरदात्यांच्या मते मजुरीमुळे कोणतेही बदल झालेले नसून त्याचे शेकडाप्रमाण १०.०० टक्के आहे.

Research Hub International Journal

वरील सारणीवरून असा निष्कर्ष निघतो की, सर्वाधिक उत्तरदात्यांची मजुरीमुळे आर्थिक परिस्थिती सुधारलेली असून त्याचे शेकडाप्रमाण ३३.३३ टक्के आहे.

**सारणी क्र. २**

**समाज जीवनावरील परिवर्तन दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | विवरण | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | आधूनिकरणाचा प्रभाव | ०१ | ०३.३३ |
| २. | नविन चालिरिती | ०५ | १६.६६ |
| ३. | स्त्री-पुरूष समानता | ०७ | २३.३३ |
| ४. | स्त्रीचा अर्थार्जनात सहभाग | १७ | ५६.६६ |
| | **एकूण** | **३०** | **१००.००** |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, एकुण ३० उत्तरदात्यांपैकी ०१ उत्तरदात्यांच्या मते, समाजामधील परिवर्तन हे आधूनिकरणाचा प्रभाव असून त्याचे शेकडाप्रमाण ०३.३३ टक्के आहे. तर ०५ उत्तरदात्यांच्या मते, समाजामध्ये नविन चालिरितीचे परिवर्तन झालेले असून, त्याचे शेकडाप्रमाण १६.६६ टक्के आहे. तसेच ०७ उत्तरदात्यांच्या मते, समाजामध्ये स्त्री-पुरूष समानता हे परिवर्तन घडून आलेले असून त्याचे शेकडाप्रमाण २३.३३ टक्के आहे. तर १७ उत्तरदात्यांच्या मते समाजामध्ये स्त्रीचा अर्थाजर्नात सहभाग वाढलेला असून त्याचे शेकडाप्रमाण ५६.६६ टक्के आहे.

वरील सारणीवरून असा निष्कर्ष निघतो की, सर्वाधिक उत्तरदात्यांचे मते, समाजामध्ये स्त्रीयांचा अर्थाजर्नात सहभाग वाढलेला असून त्याचे शेकडाप्रमाण ५६.६६ टक्के आहे.

**उपाययोजना :**

1. मजुरी करणाऱ्या महिलांनी बचत गटामार्फत कर्ज घेऊन गटात कुक्कुटपालन, शेळीपालन, मत्स पालन, वराह पालन यांसारख्या सुनियोजित व शास्त्रीय पद्धतीने व्यवसाय स्थापन करून रोजगाराच्या संधी वाढवाव्यात.
2. मजुरीस जाणाऱ्या महिलांनी आपले आत्मसन्मान जपून काम करावे.
3. मजुरी करणाऱ्या महिलांनी आपल्या कामाचा योग्य मोबदला मालकाकडून घ्यावा.
4. मजुरी करणाऱ्या महिलांनी स्वत:च्या सुरक्षिततेसाठी सुरक्षा किटचा वापर करावा.
5. मजुरी करणाऱ्या महिलांनी मजुरी कामासोबत स्वत:च्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नये.

**संदर्भ :**


- आगलावे प्रदिप - सामाजिक संशोधन पद्धती शास्त्र व तंत्र, प्रकाशन-ललिता पुराणिक श्री साईनाथ प्रकाशन१
- देशमुख प्रभाकर - श्रमाचे अर्थशास्त्र, डॉ. प्रभाकर देशमुख, प्रकाशन क्र.३१


Research Hub International Journal